जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २३० | सोमवार, १६ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




# विश्वराज हॉस्पिटलमध्ये शासकीय योजनांचा शुकशुकाट?

## रुग्णांना भरमसाट बिलांचा मार, तर पैशाच्या हव्यासापोटी रुग्णांच्या जीवाशी खेळ

**लोणी काळभोर, ता. १५ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील विश्वराज हॉस्पिटलच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, धर्मदाय रुग्णालयाच्या नावाखाली सर्वसामान्य रुग्णांची सर्रास लूट सुरू असल्याचा संतापजनक आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

धर्मदाय रुग्णालयाचा दर्जा मिळाल्यानंतरही गरीब आणि गरजू रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. उपचारांच्या नावाखाली रुग्णांकडून हजारो-लाखोंची बिले आकारली जात असून, ती कमी करून घ्यायची असतील तर राजकीय नेत्यांच्या माध्यमातून दबाव टाकावा लागतो, अशी धक्कादायक वस्तुस्थिती समोर येत आहे.

धर्मादाय तत्त्वावर चालणाऱ्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांसाठी ठराविक टक्के खाटा मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून




देणे कायद्याने बंधनकारक असते. मात्र विश्वराज हॉस्पिटलमध्ये अशा खाटांची माहितीच रुग्णांना दिली जात नसल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे हे रुग्णालय खरोखर धर्मदाय आहे की केवळ नावापुरतेच, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या या रुग्णालयात केवळ पुणे महानगरपालिकेची वैद्यकीय मदत योजना आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची योजना इतक्याच सुविधा राबवल्या जात असल्याचे सांगितले जाते. मात्र महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारतसारख्या महत्त्वाच्या योजनांचा लाभ रुग्णांना दिला जात नसल्याने अनेक गरीब कुटुंबे उपचारांपासून वंचित राहत असल्याची तक्रार पुढे येत आहे.

याहून धक्कादायक बाब म्हणजे, धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून नेमण्यात येणारा प्रतिनिधीही या रुग्णालयात कार्यरत नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे रुग्णांच्या हक्काच्या सुविधा मिळत आहेत की नाहीत, यावर देखरेख ठेवणारी यंत्रणाच गायब असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. परिणामी रुग्णालय प्रशासनावर कोणाचेही नियंत्रण उरले नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

रुग्णालय प्रशासनाने शासकीय नियम अक्षरशः धाब्यावर बसवल्याचा आरोप नागरिक करत आहेत. पैशाच्या हव्यासापोटी रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा संताप व्यक्त होत आहे. योग्य माहिती न देता उपचारांच्या नावाखाली मोठमोठी बिले आकारली जात असल्याने अनेक कुटुंबे अक्षरशः आर्थिक संकटात सापडत असल्याची उदाहरणे पुढे येत आहेत. धर्मदाय नावाखाली जर सर्वसामान्यांची लूटच होत असेल, तर हा अन्याय आम्ही किती दिवस सहन करायचा? असा सवाल करत नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीच्या चौकशीची मागणी केली आहे.

### धर्मदाय रुग्णालयाच्या नावाखाली केवळ कागदी घोडे नाचविणे?

लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये या नियमांचे केवळ कागदी पालन होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. प्रत्यक्षात गरीब आणि गरजू रुग्णांना मोफत खाटा, सवलतीचे उपचार किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे धर्मदाय रुग्णालयाच्या नावाखाली केवळ कागदी घोडे नाचवले जात आहेत का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, विश्वराज हॉस्पिटलच्या कारभाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच धर्मदाय रुग्णालयाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. आता प्रशासन या प्रकरणात कारवाईचा बडगा उगारणार का, की रुग्णांची ही हेलपाटे सुरूच राहणार, याकडे संपूर्ण पुणे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### नियमानुसार काही खाटा सवलतीच्या दरात राखीव ठेवणे बंधनकारक

धर्मदाय रुग्णालय म्हणजे ना-नफा तत्त्वावर चालणारी आरोग्य सेवा देणारी संस्था. अशा रुग्णालयांनी गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच विमा नसलेल्या रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० नुसार धर्मदाय रुग्णालयांना काही खाटा मोफत किंवा सवलतीच्या दरात राखीव ठेवणे बंधनकारक आहे. तसेच गरजू रुग्णांना विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ देणेही अपेक्षित असते.

## संक्षिप्त




### धाराशिवमधील भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

**धाराशिव, ता. १५ :** धाराशिव जिल्ह्यातील लातूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झालाय. बोलेरो, वॅगनार आणि होंडा सिटी या तीन कार एकमेकांवर आदळल्याने तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झालेत. करजखेडा पाटीजवळ हा अपघात घडलाय. बोलेरो गाडी अतिवेगात होती. चालकाचे नियंत्रण सुटल्याने बोलेरोने प्रथम वॅगनारला धडक दिली. त्यानंतर गाडी पलटी होऊन दुभाजक ओलांडत समोरून येणाऱ्या होंडा सिटी कारवर आदळली. या तिहेरी धडकेत तिन्ही वाहनांचा चक्काचूर झाला. जखमींना उपचारासाठी धाराशिव आणि सोलापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आलंय. अपघातामुळे काही काळ महा मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.




### पर्वतीत पिस्तूल बाळगणारे सराईत गजाआड

**पुणे, ता. १५ :** पर्वती परिसरात देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सराइतांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईत पोलिसांनी दोन पिस्तुलांसह काडतुसे जप्त केली.

अजित सागर कसबे (वय-२१, रा. विघ्नहर्ता सोसायटी, आंबेगाव पठार, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. कसबे याच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दहशत माजविण्यासाठी त्याने पिस्तूल बाळगले असल्याची माहिती पोलीस हवालदार महेश मंडलिक यांना मिळाली. त्यानंतर गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक काडतूस जप्त करण्यात आले.

परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक अनिता हिवरकर, उपनिरीक्षक किरण पवार, पोलीस कर्मचारी प्रकाश मरगजे, सूर्या जाधव, अमित चिव्हे, मनोज बनसोड, राकेश सुर्वे, सद्दाम शेख, अमोल दबडे यांनी ही कारवाई केली.

# पाच राज्यात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले; निवडणूक आयोगाची घोषणा

**मुंबई, ता. १५ :** केंद्रीय निवडणूक आयोग नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेत आसाम, केरळ, पद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल येथील विधानसभा निवडणुकांची घोषणा केली आहे. या राज्यांच्या विधानसभेचा कार्यकाळ मे-जूनमध्ये संपत आहे. पश्चिम बंगालमध्ये निवडणुका दोन टप्प्यात होणार आहे. तर इतर चार राज्यात एका टप्प्यात निवडणुका होणार आहेत. पाचही राज्यांची मतमोजणी ४ मे राजी होणार आहे.

आसाममध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक होईल आणि ४ मे रोजी निकाल येतील. केरळमध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक होईल आणि ४ मे रोजी निकाल येतील. पुद्दुचेरीमध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक




होईल आणि ४ मे रोजी निकाल येतील. बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यात मतदान होईल, ४ मे रोजी मतमोजणी होईल. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल आणि ४ मे रोजी मतमोजणी होईल. गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र येथील विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणाही आयोगाने केली.

निवडणुका होणाऱ्या सर्व राज्यांचा आयोगाने आढावा घेतला आहे. निवडणुका निःपक्ष आणि पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्व मतदारांनी त्यांचा मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी या राज्यांमध्ये मतदार याद्यांचे विशेष पुनर्निरीक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मतदान संपल्यानंतर दोन तासात मतदानाची टक्केवारी जारी करण्यात येणार आहे. तसेच निवडणुकीबाबतची सर्व माहिती एका ॲपवर मिळणार आहे. अफवा आणि चुकीची माहिती पसरवणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येणार, असे ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट केले.

# उरुळी कांचन येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर पाटील यांची आत्महत्या

## आत्महत्यापूर्वीच्या चिठ्ठीत व्यक्त केली अवयवदानाची इच्छा

**उरुळी कांचन, ता. १५ :** उरुळी कांचन येथील कस्तुरी प्रतिष्ठानचे सचिव व सामाजिक कार्यकर्ते शंकर पांडुरंग पाटील (वय ४८) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. घटनास्थळी सापडलेल्या चिठ्ठीत माझ्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरू नये असा स्पष्ट उल्लेख करत त्यांनी जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे उरुळी कांचन परिसरात हळहळ व्यक्त होत असून सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आश्रम रोड परिसरातील राहत्या घरात रविवारी सकाळी सुमारे नऊच्या सुमारास हा प्रकार समोर आला. शंकर पाटील यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत आपल्या मानसिक वेदना आणि



जीवनातील धक्कादायक प्रसंगांचा उल्लेख केला आहे. माझ्या मरणास कोणीही जबाबदार नाही. मी स्वतःच्या इच्छेने हा निर्णय घेत आहे, असे त्यांनी स्पष्ट नमूद केले आहे.

चिठ्ठीत त्यांनी भारतात इच्छामरणाचा कायदा नसल्याची खंत व्यक्त करत, मला जिवंतपणीच अवयवदान करायचे होते. माझ्या अवयवांमुळे चार-पाच लोकांचे आयुष्य वाचले असते. भारतात इच्छामरणाचा कायदा असावा, अशी भावना व्यक्त केली आहे. तसेच, माझे अवयव दान होत असतील तर ते करावेत, अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली आहे.

चिठ्ठीत पुढे त्यांनी आपल्या आयुष्यात साथ दिलेल्या अनेक मित्रांचे आणि सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानले आहेत. आई-वडील, नातेवाईक व मित्रांची माफी मागत माझ्या या निर्णयामुळे तुम्हाला त्रास होणार असेल तर मला माफ करा, असे भावनिक शब्द त्यांनी लिहिले आहेत.


चिठ्ठीत नमूद केल्याप्रमाणे, संजूच्या निधनानंतर माझी जगण्याची इच्छा उरली नाही. त्या घटनेचा मला मोठा मानसिक धक्का बसला. त्यातून मी अजूनही बाहेर आलो नाही. त्यानंतर झालेल्या अपघातामुळे माझी मानसिक अवस्था अधिकच खालावली. मला झोप येत नाही, रोज देवाकडे मरण मागत आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. वृद्ध आई-वडिलांची सेवा करता न आल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, शंकर पाटील हे अविवाहित असून सामाजिक कार्यात सक्रिय होते. कस्तुरी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळे, आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी अन्नदान सेवा तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये ते सातत्याने पुढाकार घेत असत. त्यांच्या आकस्मिक निधनाने उरुळी कांचन परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेची नोंद उरुळी कांचन पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# केरळ सरकार करणार संजू सॅमसनचा गौरव

**केरळ, ता. १५ :** आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मधील विजयाचा महानायक ठरलेल्या संजू सॅमसनसाठी केरळ सरकारने आनंदाची बातमी दिली आहे. केरळचे क्रीडा मंत्री व्ही. अब्दुरहीमान यांनी जाहीर केले की, सोमवारी तिरुवनंतपुरम येथील सेंट्रल स्टेडियमवर संजूचा विशेष नागरी सत्कार करण्यात येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन होणार असून, यावेळी अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

संजू सॅमसनसाठी हा विश्वचषक संघर्षाचा आणि जबरदस्त पुनरागमनाचा ठरला. स्पर्धेपूर्वी न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत त्याला केवळ ४६ धावा करता आल्या होत्या. अगदी ग्रुप स्टेजमध्येही अभिषेक शर्मा आजारी पडल्यामुळे त्याला संधी मिळाली होती. मात्र, एकदा लय सापडल्यानंतर संजूने मागे वळून पाहिले नाही. झिम्बाब्वेविरुद्धच्या सुपर-



८ सामन्यात त्याने आक्रमक सुरुवात केली आणि त्यानंतर नॉकआउट फेरीत आपली खरी ताकद दाखवून दिली.

संजूने वेस्ट इंडिजविरुद्धच्या निर्णायक सामन्यात नाबाद ९७ धावा कुटल्या. त्यानंतर मुंबईत इंग्लंडविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये ८९ आणि अहमदाबादमधील फायनलमध्ये न्यूझीलंडविरुद्ध पुन्हा ८९ धावांची वादळी खेळी केली. संपूर्ण स्पर्धेत ५ डावांत ३२१ धावा करत त्याने विराट कोहलीचा एका आवृत्तीत सर्वाधिक धावा करण्याचा भारतीय विक्रम मोडीत काढला.

# पत्नी निवडून आली, पण पद मिरवतोय पतीदेव?

## जिल्हा परिषद गटावर पतीचेच राज्य? हवेली तालुक्यात लोकशाहीला सुरुंग

**लोणी काळभोर, ता. १५ :** हवेली तालुक्यातील एका जिल्हा परिषद गटात सध्या लोकशाहीपेक्षा घरशाहीचाच कारभार सुरू असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. या गटातून निवडून आलेल्या एका महिला सदस्यांच्या पतीचा सर्वच ठिकाणी वाढलेला हस्तक्षेप नागरिकांच्या रोषाचे कारण ठरत असून, उद्घाटने, सत्कार समारंभ, बैठका आणि विकासकामांची पाहणी करताना तो सातत्याने पुढे दिसत असल्याने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळातही भुवया उंचावल्या आहेत.

लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेली व्यक्ती एक असताना प्रत्यक्षात सर्व निर्णय आणि हालचाली मात्र पतीच्या माध्यमातून होत असल्याचे चित्र सध्या गटात दिसत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे लोकांनी मतदान करून निवडून दिलेला प्रतिनिधी कोण, अधिकार वापरणारा आणि पद मिरवणारा कोण? असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जाऊ लागला आहे.

संबंधित व्यक्तीने निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करून पत्नीला निवडून आणल्याची चर्चा तालुक्यात रंगली होती. निवडणुकीनंतर आता अधिकृत पद महिला सदस्यांच्या नावावर असले तरी गटातील कार्यक्रम, अधिकाऱ्यांशी संपर्क, लोकांच्या तक्रारी आणि विकासकामांची पाहणी यामध्ये




पतीच पुढे असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे.

गावागावात होणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित राहताना तो स्वतः ला पदाधिकारी असल्याप्रमाणे वागत असल्याचीही चर्चा आहे. काही ठिकाणी अधिकाऱ्यांशी चर्चा करणे, कामांची पाहणी करणे आणि लोकांच्या तक्रारी ऐकणे अशा भूमिका तो घेत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परिणामी लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या प्रतिनिधीची भूमिका दुय्यम ठरत असून अनधिकृत सत्ताकेंद्र निर्माण होत असल्याची टीका होत आहे.

या लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांनी थेट सत्तेच्या व्यवहारात हस्तक्षेप करणे ही लोकशाहीसाठी अत्यंत घातक बाब आहे. कारण मतदारांनी विश्वास ठेवून दिलेले अधिकार जर दुसऱ्याच व्यक्तीकडून वापरले जात असतील, तर त्यातून लोकशाहीच्या मूलभूत तत्वांनाच धक्का बसतो. त्यामुळे अशा प्रकारांवर वेळीच लगाम घालणे अत्यावश्यक आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकारामुळे हवेली तालुक्यातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पद एका व्यक्तीकडे आणि सत्ता दुसऱ्याच व्यक्तीकडे अशी स्थिती निर्माण झाली असल्याचा आरोप करत नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सत्तेचा आणि पदाचा हा उघडपणे होत असलेला गैरवापर थांबवणार कोण? असा सवालही आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेला प्रतिनिधीच कामकाज सांभाळणे अपेक्षित असताना सावकार पतीच जिल्हा परिषद गट चालवत असल्याचे चित्र समोर येत असल्याने प्रशासन आणि संबंधित राजकीय पक्षांच्या वरिष्ठांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा अशा घरशाही मुळे लोकशाहीवरील जनतेचा विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पतीसह दोघांवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. १५ :** पुण्यातील लोणीकंद परिसरातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली असून लग्नाला केवळ ८ महिने पूर्ण होण्याआधीच एका २२ वर्षीय विवाहितेने आपले जीवन संपवले आहे. वैष्णवी लाटे असे या तरुणीचे नाव आहे. हुंड्यासाठी आणि पैशांच्या हव्यासापोटी सासरच्या मंडळींनी केलेल्या छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पतीसह सासू आणि सासऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे.



वैष्णवीचे लग्न ११ मार्च २०२५ रोजी यशवंत लाटे याच्याशी ठरले होते. लग्न ठरल्यापासूनच सासरच्या मंडळींकडून पैशांची मागणी सुरू झाल्याचे समजते. सुरुवातीला नवीन घराच्या फर्निचरसाठी २ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती, जी वैष्णवीच्या माहेरच्यांनी पूर्ण केली होती. त्यानंतर ७ मे रोजी मोठ्या थाटामाटात लग्न पार पडले. लग्नातही मानपान आणि संसारासाठी आवश्यक असलेल्या सर्व वस्तू देण्यात आल्या होत्या. मात्र, लग्नानंतर काही दिवसातच वैष्णवीचा छळ सुरू झाला.

वैष्णवीला तिचा पती यशवंत याचे दुसऱ्या मुलीसोबतचे चॅटिंग सापडले होते. तिने याबद्दल जाब विचारला असता तिला मारहाण करून माहेरी पाठवून देण्यात आले. त्यानंतर तिला पुन्हा नांदवण्यासाठी ५ लाख रुपये आणि चारचाकी गाडीची मागणी करण्यात आली. मुलीचा संसार वाचावा या हेतूने तिच्या पालकांनी १७ जानेवारी २०२६ रोजी ५ लाख रुपये रोख दिले होते. तरीही सासरच्यांचे समाधान झाले नाही. आता घराच्या सजावटीसाठी म्हणजेच इंटेरियरसाठी पुन्हा २० लाख रुपयांची मागणी करण्यात येत होती. पैसे आणले नाही तर तोंड दाखवू नकोस, अशी धमकी पतीने दिल्याचे वैष्णवीने आपल्या आईला फोनवरून सांगितले होते. यानंतर तिचे कुटुंबीय तिला भेटायला सासरी गेले असता, पैसे न मिळाल्यास मुलाचे दुसरे लग्न लावून देऊ, अशी धमकी सासरच्यांनी दिली. आई भेटून गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशी वैष्णवीने राहत्या घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## संक्षिप्त

### म्हाडात सदनिकेत मिळवून देण्याच्या आमिषाने महिलेची फसवणूक

**पुणे, ता. १५ :** महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडून (म्हाडा) वितरित करण्यात येणारी सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून एकाने महिलेची एक लाख २० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिसांकडून एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३७ वर्षीय महिला पिंपरी-चिंचवडमधील रहाटणी परिसरात राहायला आहे. फिर्यादी महिला आणि तिच्या पतीची आरोपीशी ओळख झाली. आरोपीने महिला आणि तिच्या पतीला म्हाडात सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर आरोपीने तक्रारदार महिला आणि तिच्या पतीला कोंढवा भागातील एका इमारतीजवळ बोलाविले. सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून एक लाख २० हजार रुपये घेतले.

### परदेशी चलन व्यवहारात गुंतवणुकीच्या आमिषाने ४० लाखांची फसवणूक

**वानवडी, ता. १५ :** परदेशी चलन व्यवहारात (फोरेक्स) गुंतवणुकीच्या आमिषाने एकाची ४० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एकाने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे वानवडी भागात राहायला आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला. परदेशी चलन व्यवहारात गुंतवणुकीचे आमिष दाखविले. गुंतवणूक केल्यास नफा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्यांना पैसे भरण्यास सांगितले. चोरट्यांच्या खात्यात तक्रारदाराने वेळोवेळी ३९ लाख ९५ हजार रुपये जमा केले. चोरट्यांनी त्यांना परतावा दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब जाधव तपास करत आहेत.

### शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने महिलेची फसवणूक

**पुणे, ता. १५ :** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एका महिलेची दहा लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी डेक्कन पोलिसांनी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ५१ वर्षीय महिला विधी महाविद्यालय रस्त्यावर राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला. शेअर बाजराात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्यांना जाळ्यात ओढले. चोरट्यांच्या खात्यात महिलेने नऊ लाख ९१ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यनंतर चोरट्यांनी महिलेला परतावा दिला नाही. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर तपास करत आहेत.


### बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीची घोषणा

**मुंबई, ता. १५ :** केंद्रीय निवडणूक आयोगाने तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुदुचेरी या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची तारीख जाहीर केली आहे. तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुदुचेरी या राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच टप्प्यात होणार असून, पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान होईल. या निवडणुकांसोबतच देशभरातील विविध राज्यांतील ८ विधानसभा रिक्त जागांसाठी पोटनिवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन महत्वाच्या मतदारसंघांचा समावेश आहे. भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानं अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा म तदारसंघाची जागा रिक्त झालेली आहे. तर, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात निधन झालं. यामुळं बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे.

# लोणी काळभोर येथे चुलत्याकडून पुतणीवर अत्याचार; आरोपीला सात दिवसांची कोठडी

**लोणी काळभोर, ता. १५ :** लोणी काळभोर परिसरात नातेसंबंधांनाच काळीमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. सख्ख्या चुलत्यानेच पुतणीवर वारंवार बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या अमानुष घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेमुळे पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी २२ वर्षीय पीडितेच्या आईने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या फिर्यादीच्या आधारे पोलिसांनी आरोपी चुलत्याविरुद्ध बलात्कारासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.



गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली. अटक केलेल्या आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला घरकाम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. एके दिवशी त्या नेहमीपेक्षा लवकर घरी परतल्या असता त्यांना घरात अत्यंत धक्कादायक दृश्य पाहायला मिळाले. त्यांच्या दीरानेच त्यांच्या मोठ्या मुलीवर जबरदस्तीने अत्याचार करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हे दृश्य पाहताच फिर्यादींच्या पायाखालची जमीनच सरकली.

यानंतर त्यांनी मुलीला धीर देत विश्वासात घेतले आणि अधिक चौकशी केली असता, आरोपीने धमकी देत वारंवार अत्याचार केल्याचे समोर आले. भीतीपोटी मुलीने हा प्रकार दीर्घकाळ कुणालाही सांगितला नव्हता. मात्र आईने रंगेहात पकडल्यानंतर हा भयानक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पीडितेच्या आईने तात्काळ लोणी काळभोर पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपीविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून अशा नराधमांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपाली जाधव करत आहेत.

# कोरेगाव मूळ येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा जागीच मृत्यू

**उरुळी कांचन, ता. १५ :** पुणे-सोलापूर महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, कोरेगाव मूळ (ता. हवेली) हद्दीत अज्ञात वाहनाच्या धडक्त एका अज्ञात इसमाचा जागीच मृत्यू झाला. कोरेगाव मूळ हद्दीतील इनामदार वस्ती परिसरात असलेल्या अमर रोज नर्सरी समोर रविवारी (ता. १५) सकाळी सहा वाजण्याच्या सुम ारास हि घटना घडली.

याप्रकरणी सचिन रामराव कडवळे (वय-४७ व्यवसाय शेती, रा. कड वस्ती कोरेगाव मुळ ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कोरेगाव मूळ गावच्या हद्दीतील महामार्गावर एक अनोळखी व्यक्ती पायी जात होती. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या एका अज्ञात वाहनाने या इसमास जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, सदर व्यक्तीला गंभीर दुखापत होऊन तिचा जागीच मृत्यू झाला.

अपघात झाल्यानंतर जखमीला रुग्णालयात दाखल करण्याऐवजी अज्ञात चालकाने तिथून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच कोरेगाव मूळ येथील रहिवासी सचिन कडवळे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २८१, १०६(१), १२५(ब), १२५(अ) आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ नुसार गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सहायक फौजदार सस्ते करीत आहेत.

# वाघोलीत इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला; दोघे जण जखमी, तिघांवर गुन्हा दाखल

**वाघोली, ता. १५ :** किरकोळ वादातून तीन जणांनी इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यावर धारदार शस्त्राने हल्ला करत त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात विद्यार्थ्याच्या डोक्यात धारधार कोयता अडकून राहिला असल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

नागेश सुनील जगताप असे हल्ल्यात जखमी झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. तर मंगेश सांगळे (रा. रायसोनी कॉलेज जवळ, वाघोली पुणे) व अनोळखी दोन तरुण असे हल्ला केलेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी नागेश जगताप याचा मित्र सिध्देश बबनराव भोसले (वय २२, धंदा शिक्षण सध्या रा. बी. विंग फ्रेंट में ८ महावीर कॉम्पलेक्स आव्हाळवाडी रोड, वाघोली ता. हवेली मुळगाव गुंज बुद्रुक ता. अंबड जि. जालना) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धेश भोसले आणि त्याचा मित्र नागेश जगताप हे दोघे रायसोनी कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्सच्या चौथ्या वर्षात शिकत आहेत. गुरुवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास हे दोघे कॉलेज समोरील 'अखंड अमृततुल्य' चहा हॉटेलच्या वट्यावर बसले होते. त्याच वेळी दुचाकीवरून त्यांच्या ओळखीचा मंगेश सांगळे आणि त्याचे दोन मित्र तेथे आले. तू मला शिवी का दिली? असे म्हणत मंगेशने वादाला सुरुवात केली. काही कळण्याच्या आतच मंगेशच्या दोन साथीदारांनी नागेशवर धारदार शस्त्रांनी हल्ला चढवला.




आपल्या मित्राला वाचवण्यासाठी सिद्धेश मध्ये पडला असता, हल्लेखोरांनी त्याच्यावरही वार केले. यात सिद्धेशच्या दोन्ही हातांना आणि दंडाला गंभीर जखमा झाल्या. तुला आता सोडत नाही, तू कसा जगतो तेच बघतो, असे ओरडत मंगेश आणि त्याच्या साथीदारांनी नागेशच्या डोक्यात आणि पाठीवर एकामागून एक वार केले. यातील एक शस्त्र नागेशच्या डोक्यातच रुतून बसले. घटनास्थळी आरडाओरडा झाल्यानंतर आरोपींनी दोन कोयते तेथेच टाकून पळ काढला. जखमी नागेश जगताप यांच्या डोक्यात कोयता अडकून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. नागेश आणि जखमी सिध्देश भोसले यांना त्यांच्या मित्राने तातडीने वाघोली येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर नागेश यांना पुढील उपचारासाठी खराडी येथील येथील हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सध्या सुरू आहेत.

दरम्यान, याप्रकरणी सिद्धेश भोसले याने दिलेल्या फिर्यादीवरून वाघोली पोलीस ठाण्यात मंगेश सांगळे आणि त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींचा शोध सुरू आहे. भरदिवसा कॉलेजसमोर घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुंबई–पुण्यातील अंतर कमी होणार 'मिसिंग लिंक'चं काम पूर्ण

**पुणे, ता. १५ :** मुंबई आणि पुणे दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित करण्यासाठी उभारण्यात आलेल्या बहुप्रतिक्षित मुंबई-पुणे मिसिंग लिंक प्रकल्पाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या प्रकल्पाचे काम जवळपास पूर्ण झाले असून लवकरच तो वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांमधील अंतर सुमारे ६ किलो मीटरने कमी होणार असून प्रवासाचा वेळ अंदाजे २५ ते ३० मिनिटांनी कमी होईल. मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील खंडाळा घाटातील अवघड आणि वळणदार मार्ग टाळण्यासाठी हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. सध्या घाट विभागात वारंवार अपघात, भूस्खलन आणि वाहतूक कोंडीच्या




घटना घडतात. मिसिंग लिंक मार्ग सुरू झाल्यानंतर खोपोली एक्झिट ते कुसगाव दरम्यानचा घाट विभाग मोठ्या प्रमाणात बायपास होणार असल्यामुळे वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे १३.३ किलोमीटर आहे. त्यामध्ये ६५० मीटर लांबीचा केबल-स्टेड पूल आणि दोन मोठे बोगदे समाविष्ट आहेत. यापैकी एक बोगदा सुमारे ८.९ किलो मीटर लांबीचा असून तो देशातील सर्वात लांब आणि रुंद बोगद्यांपैकी एक मानला जात आहे. टायगर व्हॅली परिसरात उभारण्यात आलेल्या पुलाचे खांब सुमारे १८२ मीटर उंच आहेत, जे जवळपास ६० मजली इमारतीइतके आहेत. त्यामुळे हा पूल भारतातील सर्वात उंच रस्ते पुलांपैकी एक ठरणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) हा प्रकल्प साकारला असून त्यासाठी सुमारे ६६९५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. अलीकडील माहितीनुसार प्रकल्पाचे जवळपास ९८ टक्के काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र दिन म्हणजेच १ मे २०२६ रोजी या प्रकल्पाचे उद्घाटन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, हा मार्ग सुरू झाल्यानंतर मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. विशेषतः घाटातील अपघात किंवा वाहन बिघाडामुळे होणाऱ्या लांबच लांब वाहतूक कोंडीचा त्रास कमी होईल. त्यामुळे मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांमधील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बारामतीत प्रिझ्मा आय केअर हॉस्पिटलमध्ये चोरी

**बारामती, ता. १५ :** बारामती शहरातील भिगवण रोडवरील संगवी टाऊनशिप परिसरातील प्रिझ्मा आय केअर हॉस्पिटलमध्ये अज्ञात चोरट्याने धाडसी घरफोडी करत तब्बल १५ लाख रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शुक्रवारी (ता. १३) सकाळी सुमारे सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे बारामतीतील डॉक्टर आणि व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सुमारे सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास चोरट्याने हॉस्पिटलच्या मुख्य दरवाजाच्या लॉकजवळील ग्रॅनाईटची चौकट फोडून आत प्रवेश केला. आत गेल्यानंतर त्याने थेट कॅश ड्रॉवर उचकटून त्यामध्ये ठेवलेली १५ लाख रुपयांची रोकड लंपास केली आणि घटनास्थळावरून पसार झाला. या चोरीची संपूर्ण घटना हॉस्पिटलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्या फुटेजच्या आधारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

या प्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात भा. न्या. संहिता कलम ३०५ व ३३१ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभारी पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले असून आरोपीचा माग काढण्यासाठी तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तपास सुरू आहे.

**पोलिसांचे नागरिकांना आवाहन**

या घटनेनंतर बारामती शहर पोलिसांनी नागरिक आणि व्यावसायिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. दुकाने, दवाखाने किंवा कार्यालयात मोठी रोख रक्कम ठेवू नये. सीसीटीव्ही आणि सुरक्षा व्यवस्था नियमित तपासावी. रात्रीच्या वेळी वॉचमन किंवा सुरक्षारक्षक ठेवावा. परिसरात संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ ११२ वर पोलिसांना कळवावे.

# कीर्तनकार महाराजाचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पारनेर तालुक्यात घडली घटना

**अहिल्यानगर, ता. १५ :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अध्यात्म, संस्कार आणि वारकरी परंपरेचे धडे देणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षानेच एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तब्बल ५ वर्षे अत्याचार केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

ढवळपुरी येथील श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याच्यावर हा आरोप आहे. पीडित मुलगी इयत्ता ८ वीमध्ये शिकत असताना, म्हणजे सुमारे २०२१ पासून आरोपीने तिच्यावर अत्याचार सुरू केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आरोपी पीडितेच्या शेजारी राहत असल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये परिचय होता. याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्याने मुलगी घरी एकटी असताना किंवा स्वतःच्या घरी कोणी नसताना तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे.



पीडितेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने तिला आणि तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. मी आधीही २ हाफ मर्डर केले आहेत, कोणाला काही सांगितले तर तुझ्या आई-वडिलांना आणि भावाला संपवेन, अशी भीती तो दाखवत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे भीतीपोटी पीडित मुलगी अनेक वर्षे हा छळ सहन करत होती. या प्रकरणाचा थरार १० मार्च २०२६ रोजी समोर आला. आरोपीने पीडितेला फोन करून घरी बोलावले.

तिने जाण्यास नकार दिल्यानंतर कुटुंबाला ठार मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर पीडिता त्याच्या घरी गेली असता आरोपीने तिला एका खोलीत नेऊन मारहाण केली आणि स्वयंपाकघरातील लोखंडी पक्कड गरम करून तिच्या अंगावर चटके दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर पुन्हा तिच्यावर अत्याचार केल्याचे सांगितले जाते.

१४ मार्च रोजी पीडितेचा भाऊ घरी आल्यानंतर तिची अवस्था पाहून त्याने विचारपूस केली. त्यानंतर मुलीने मागील ५ वर्षांपासून सुरू असलेला छळ सांगितला. यानंतर कुटुंबीयांनी पारनेर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला १५ मार्च रोजी पहाटे ४ वाजता अटक केली. न्यायालयाने त्याला २० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या घटनेमुळे वारकरी संप्रदाय आणि धार्मिक संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# कदमवाकवस्ती ग्रामपंचायत लवकरच स्वतंत्र अत्याधुनिक कचरा प्रकल्प उभारणार : माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड

### लोणी काळभोरमध्ये कचऱ्याच्या प्रश्नावर शांतता

**लोणी काळभोर, ता. १४ :** लोणी काळभोर आणि कदम वाकवस्ती परिसरातील वाढत्या कचरा समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कदमवाकवस्ती ग्राम पंचायतीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. दोन्ही गावांच्या कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विविध पर्यायांवर विचार सुरू असून लवकरच स्वतंत्र अत्याधुनिक कचरा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती कदमवाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड यांनी दिली.

कदमवाकवस्ती गावातील कचरा पूर्वीपासून लोणी काळभोर येथील एम आयटी कॉलेज शेजारील गट क्रमांक ११३ या सरकारी जागेत टाकण्यात येत होता. अनेक वर्षे ही जागा डंपिंगसाठी



वापरली जात होती. मात्र सध्या एम आयटी प्रशासनाने त्या ठिकाणी कचरा टाकण्यास विरोध केल्यामुळे गावातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. परिणामी गावात कचऱ्याचे ढिग वाढू लागले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

या वाढत्या समस्येवर ठोस उपाययोजना ठरवण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी शनिवारी (ता. १४) सकाळी सुमारे अकरा वाजता पालखी तळावर विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेत ग्रामस्थांनी विविध पर्यायांवर चर्चा करत कचरा व्यवस्थापनासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. अखेर चर्चेनंतर कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या विशेष ग्राम सभेला जिल्हा परिषद सदस्या शीतल सुजित कांबळे, पंचायत समिती सदस्य अमोल टेकाळे, कदमवाकवस्तीच्या माजी सरपंच गौरी गायकवाड, उपसरपंच नासिर पठाण, निलेश काळभोर, दीपक काळभोर, सतीश काळभोर, आकाश काळभोर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना चित्तरंजन गायकवाड म्हणाले की, लोणी काळभोर व कदमवाकवस्ती या दोन्ही गावांमधील वाढत्या लोकसंख्येमुळे कचऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या समस्येवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्यासाठी सध्या चार ते पाच प्रकल्पांचे प्रस्ताव समोर आले असून पुढील आठ दिवसांत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले. दोन्ही गावांच्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी दोन्ही गावांच्या मधील गायरान जागेचा पर्यायही विचाराधीन आहे. मात्र, योग्य जागा उपलब्ध न झाल्यास कदमवाकवस्ती ग्राम पंचायत स्वतंत्र कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, गावातील कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थ एकत्र येऊन प्रयत्न करत असल्याने कदमवाकवस्तीमध्ये लवकरच आधुनिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारला जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळणार आहे.

**लोणी काळभोरमध्ये कचऱ्याच्या प्रश्नावर शांतता**

सध्या लोणी काळभोर गावामध्ये कचऱ्याच्या प्रश्नासंदर्भात कोणतीही ठोस चर्चा किंवा हालचाल दिसून येत नाही. परिसरात कचरा व्यवस्थापनाचा मुद्दा अधूनमधून समोर येत असला तरी त्यावर कोणताही ठोस निर्णय किंवा सार्वजनिक पातळीवर चर्चा होत नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे गावातील कचरा प्रश्नाबाबत पुढे काय भूमिका घेतली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### विद्यार्थ्यांचे आंदोलन

लोणी काळभोर परिसरातील कचऱ्याच्या प्रश्नावरून एमआयटी परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (ता. १३) आंदोलन छेडले. कचऱ्याच्या दुर्गंधी व प्रदूषणामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी कचरा वाहतूक करणाऱ्या गाड्यांना प्रवेशबंदी घातली. सुमारे चार ते साडेचार हजार विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले होते. या आंदोलनामुळे लोणी काळभोर व कदमवाकवस्ती गावांचा कचरा एमआयटी परिसरातून नेण्यास बंदी घालण्यात आली.

### गावात कचऱ्याचे ढीग


कदमवाकवस्ती व लोणी काळभोर गावात सध्या ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे चिंताजनक चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये तसेच काही वस्ती भागांमध्ये कचरा टाकला जात असल्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी मोठ्या प्रमाणात पसरत आहे. या साचलेल्या कचऱ्यामुळे माशा, डास आणि इतर कीटकांची संख्या वाढत असून त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावला नाही, तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरित ठोस उपाययोजना करून कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

---

# लष्कर भरती परीक्षेत तोतयागिरी केल्याप्रकरणी २ डमी उमेदवारांवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. १५ :** पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात लष्कराशी संबंधित भरती प्रक्रियेत तोतयागिरी करून परीक्षा देण्याचा प्रयत्न उघडकीस आला आहे. लष्कराच्या कुक पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत डमी उमेदवार बसवून फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या जनरल रिझर्व्ह इंजिनिअरिंग फोर्सचे कमलु उमाकांत नारायणासा यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार साहिल करणसिंग (वय २३, रा. थुआ, ता. अलेवा, जि. जिंद, हरियाणा) आणि शिवा



राजकुमार (वय २३, रा. उरावर, ता. सिरसागंज, जि. फिरोजाबाद, उत्तर प्रदेश) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धानोरी रोडवरील भैरवनगर येथे असलेल्या ग्रेफ सेंटर बीआरओ येथे एमएसडब्ल्यू कुक (वर्ग ३) पदासाठी १२ मार्च रोजी सकाळी ६ ते साडेदहा वाजेच्या दरम्यान लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेसाठी एकूण ७६६ उमेदवार उपस्थित होते. परीक्षेसाठी येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराची ओळख बायोमेट्रिक पद्धतीने तपासून त्यानंतरच त्यांना परीक्षा कक्षात पाठवले जात होते.

दरम्यान, रिक्युटिंग बटालियनचे कमांडर पी. अरविंद उमेदवारांची कागदपत्रे तपासत असताना काही उमेदवार संशयास्पद वाटल्याने त्यांनी त्यांची चौकशी केली. त्यावेळी डुमरखा खुर्द (जि. जिंद, हरियाणा) येथील उमेदवाराच्या जागी साहिल करणसिंग हा डमी उमेदवार म्हणून परीक्षा देत असल्याचे आढळून आले. तसेच प्रमोद कुमार या उमेदवाराच्या नावाने शिवा राजकुमार हा परीक्षा देत असल्याचेही उघड झाले.तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. शिवा राजकुमार याने १० मार्च रोजी झालेल्या त्याच भरती प्रक्रियेतील दुसऱ्या परीक्षेतही राजीव अशोक कुमार यादव (रा. उरावर, जि. फिरोजाबाद, उत्तर प्रदेश) या उमेदवाराच्या नावाने डमी उमेदवार म्हणून परीक्षा दिल्याचे समोर आले.

या प्रकरणानंतर दोघांनाही ताब्यात घेऊन विश्रांतवाडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. दुसऱ्याच्या नावाने परीक्षा देऊन शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लाखे करत आहेत.

# फास्टॅग वार्षिक पास १ एप्रिलपासून महागणार

**पुणे, ता. १५ :** राष्ट्रीय महा मार्गांवर वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. १ एप्रिल २०२६ पासून वार्षिक टोल पासच्या दरात वाढ होणार असून आता वाहनचालकांना या पाससाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHI) २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक टोल पासचे नवे दर जाहीर केले आहेत.




नव्या दरांनुसार, आतापर्यंत तीन हजार रुपये असलेला वार्षिक टोल पास १ एप्रिलपासून ३०७५ रुपयांचा होणार आहे. ही सुविधा केवळ खाजगी, म्हणजे गैर-व्यावसायिक वाहनांसाठी उपलब्ध असून वाहनावर सक्रिय FSTag असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय महामार्गांवर नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी हा पास सोयीस्कर पर्याय मानला जातो.

या वार्षिक टोल पासची वैधता एक वर्ष किंवा २०० टोल क्रॉसिंगपर्यंत असते. म्हणजे एखाद्या वाहनाने २०० वेळा टोल प्लाझा पार केल्यास पासची मुदत संपते, जरी वर्षाची कालमर्यादा पूर्ण झाली नसली तरी. त्यामुळे वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी हा पर्याय फायदेशीर मानला जात असला तरी दरवर्षी होणाऱ्या दरवाढीचा परिणाम त्यांच्या खर्चावर होणार आहे.

NHI ने देशभरातील टोल प्लाझा आणि संबंधित अधिकाऱ्यांना १ एप्रिलपासून नवीन दर लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच प्रवाशांना या बदलाबाबत माहिती देण्यासही सांगितले आहे. टोल दरांचा दरवर्षी आढावा घेऊन त्यात आवश्यक ते बदल केले जातात आणि त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून यावेळी वार्षिक पासच्या किमतीत थोडी वाढ करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

राष्ट्रीय महामार्गांवर नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना हा वार्षिक टोल पास ऑनलाइन पद्धतीने मिळू शकतो. वाहनमालक NHI च्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा FSTag जारी करणाऱ्या बँक अथवा ॲपवर लॉग इन करून अर्ज करू शकतात. निर्धारित शुल्क भरल्यानंतर हा पास थेट FSTag शी जोडला जातो आणि त्यानंतर टोल प्लाझावर वेगळे शुल्क भरावे लागत नाही. त्यामुळे दरवाढ झाली असली तरी नियमित प्रवाशांसाठी हा पर्याय अद्यापही सोयीचा मानला जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## तळपायांना उन्हाळ्याच्या दिवसात का मसाज करायला हवा, जाणून घ्या आरोग्यवर्धक फायदे

उन्हाळ्यात शरीरामध्ये मोठ्या प्रमाणात उष्णता वाढते. अशावेळी आपल्या शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी तळपायंना मसाज करणे हा एक उत्तम पर्याय आहे. दिवसभर उन्हात फिरण्यामुळे अंगाची लाही लाही होते. याचा त्रास डोळ्यांनाही होतो. डोळ्यांची जळजळ उन्हाळ्यात फार मोठ्या प्रमाणात होते. तसेच उन्हामुळे आपल्या पायांनाही मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. त्यामुळेच उन्हाळ्यात पायांची निगा राखणं हे खूप गरजेचे आहे.

दिवसभराच्या थकव्यामुळे अनेकदा स्नायू दुखतात. अशा परिस्थितीत, यापासून आराम मिळवण्यासाठी, आपण दररोज पायांची मालिश करू शकता. स्नायूंच्या दुखण्यापासून आराम मिळेल. तसेच तुम्हाला आराम वाटेल. पायाला मसाज केल्याने स्नायू सक्रिय होतात.

उन्हाळ्यात पायांना मोहरीच्या तेलाने मालिश करण्याचेही खूप फायदे होतात. मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने रक्ताभिसरण सुधारते. त्यामुळे तणावही दूर होतो. हलक्या सूर्यप्रकाशात मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने शरीराला व्हिटॅमिन डी मिळतो.

उन्हाळ्याच्या दिवसात ऑलिव्ह ऑईलचा वापर केल्याने पाय दुखण्यापासून आराम मिळतो. त्याच वेळी, तणाव दूर होतो. ऑलिव्ह ऑइल हलकेकोमट करून मसाज करावे. पायांना मसाज करण्यासाठी हे तेल खूप फायदेशीर आहे.

उन्हाळ्यात पायांच्या मसाज दरम्यान, तळवे देखील मालिश केले जातात, यामुळे घोट्याच्या दुखण्यापासून आराम मिळतो.

४० वर्षांनंतर, स्त्रियांना अनेकदा घोट्याच्या आणि पायांच्या दुखण्याने त्रास होतो. अशावेळी घोट्याच्या दुखण्याने त्रस्त असाल तर पायाचा मसाज तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. रोज रात्री झोपताना पायाची मालिश करावी. यामुळे दुखण्यात आराम मिळेल.

उन्हाळ्यात पायांना मसाज केल्याने रक्ताभिसरण वाढते, ज्यामुळे नसा आराम होतो आणि घोट्याच्या वेदना कमी होतात.

उन्हाळ्यामध्ये पीरियड्स येतात तेव्हा शरीरातील उष्णता ही अधिक वाढते. अशा स्थितीत पायांना मसाज करून मासिक पाळीच्या दुखण्यापासून आराम मिळू शकतो. पायांना मसाज केल्याने मासिक पाळीच्या दरम्यान मूड स्विंगपासूनही आराम मिळतो, तसेच थकवाही कमी होतो.

उन्हाळ्यात रात्रीची झोप येत नाही, अशावेळी रोज रात्री पायाला तेलाने मसाज केल्यामुळे, शरीराचा थकवा आणि तणाव दोन्ही दूर होतील आणि चांगली झोपही लागेल.

# अमेरिकेबरोबर भारताने केलेला व्यापार करार हीच देशाची बदनामी : संजय राऊत यांची टीका

**मुंबई, ता. १५ :** काँग्रेस देशाची बदनामी करतेय, या भाजपच्या आरोपावर बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. सर्वात आधी नरेंद्र मोदींनी देशाची बदनामी करणं थांबवावं. प्रेसिडन्ट ट्रम्प यांच्या दबावाखाली अमेरिकेबरोबर हिंदुस्थाने केलेला व्यापार करार ही देशाची बदनामी. ट्रम्प आपल्याला सांगतायत की तेल कुणाकडून खरेदी करायचे, याला सन्मान म्हणायचा की बदनामी म्हणायची?, असा सवाल करत संजय राऊत यांनी भाजपला फटकारले आहे.

नरेंद्र मोदींनी देशाची बदनामी करणं थांबवावं आणि देवेंद्र फडणवीसांनी त्यांचं समर्थन करणं थांबवावं. संघर्ष थांबवण्याची क्षमता जर नरेंद्र मोदी यांच्यात असती तर इराण इस्त्रायलमध्ये हजारो निरपराध लोकांचे बळी गेले ते गेले नसते. या सगळ्याला जबाबदार मोदींचे मालक ट्रम्प आहेत. यावर मोदींनी एक शब्दही काढलेला नाही. प्रेसिडन्ट ट्रम्प यांच्या दबावाखाली मोदींनी ऑपरेशन सिंदूर अचानक मागे घेतले. तसा दबाव या युद्धाच्या बाबतीत मोदींनी ट्रम्प यांच्यावर आणायला हवा होता. या युद्धावर स्पेन, इटली, रशिया, चीन आपलं मत व्यक्त करत आहेत. पण नरेंद्र मोदींकडून कोणतेही मत भूमिका व्यक्त झालेली नाही. ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट, असे संजय राऊत म्हणाले.



अमेरिकेबरोबर हिंदुस्थानने केलेला व्यापार करार हीच देशाची बदनामी आहे. प्रे. ट्रम्प यांच्या दबावाखाली अमेरिकेने शेतकऱ्यांचं नुकसान करणाऱ्या दळभद्री अटी लादल्या आहेत. ट्रम्प आम्हाला सांगतायत की कुणाकडून आम्ही तेल खरेदी करायची. याला सन्मान म्हणायचा की बदनामी म्हणायची. महाराष्ट्राच्या बाबतीतही काही वेगळं घडत नाही. पण आम्ही गप्प आहोत. आजही देशात श्रसि साठी रांगा लागल्या आहेत. शिर्डीतल्या साई संस्थानात प्रसादाचा एकच लाडू देतायत. कारण गॅस नाही. देवासमोर तरी खोटं बोलू नका. मंदिरातल्या जेवणात दोन चपात्या देत होते त्यात एक चपाती कमी केलीय. देशातल्या सर्व देवस्थानात हीच परिस्थिती आहे. मुंबईत ४० टक्के रेस्टॉरंट बंद आहेत. हजारो लोकांचा रोजगार गेलाय. ही महाराष्ट्राची, मुख्यमंत्र्यांची व पंतप्रधानांची बदनामी आहे. हे सगळं जर कुणाला समजत नसेल तर त्यांच्यासमोर डोकं फोडून काय उपयोग, असा संताप संजय राऊत यांनी व्यक्त केला.

आपल्या देशात जेव्हा सत्तापालट होईल तेव्हा देशाची ही जी काही लूट, मानहानी, बदनामी झाली आहे त्यासाठी मोदींना जबाबदार धरलं जाईल. जगातल्या संघर्षावर, देशातल्या अस्थिरतेवर, महागाईवर बोलत नाही. ते केरळ, तामिनाडू, आसाम, प. बंगालच्या निवडणूकांवर लक्ष देतायत. हे देशाचे नाही तर भाजपचे पंतप्रधान आहेत, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी वृत्तपत्रातील एका बातमीचा देखील संदर्भ दिला. त्यांनी सांगितले की, इराणच्या सामुद्रधुनीतून जी जहाजे इंधन घेऊन निघाली आहेत आधी गुजरातला जाणार हे मी आजच्या वृत्तपत्रात वाचलं. तिथे माल उतरवला जाणार मग उरलेला माल देशाला दिली जाणार, असे ते म्हणाले.

### वांगचूक यांनी आरसा दाखवला म्हणून ते देशद्रोही

सोनम वांगचूक यांचं आम्ही अभिनंदन करतो. रासूका अंतर्गत त्यांना बेकायदेशीररित्या अटक केलेली. ज्याला तुम्ही पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केलं, ज्याने निर्माण केलेलं मॉडेल तुम्ही मान्य केलं. त्या व्यक्तीने लडाख संदर्भात सरकारने दिलेली वचनं पूर्ण करावी अशं आवाहन केलं व त्यासाठी लोकांनी आदोलंन केलं तर तो देशद्रोही. हेच वांगचूक तुमचे लाडके होते. मन की बात मध्ये तुम्ही त्यांच्याविषयी सांगितले होते. आता तेच वांगचूक तुम्हाला आरसा दाखवायला लागला म्हणून तो देशद्रोही ठरला. देशातले एकजात सगळ्या भ्रष्टाचारी व देशद्रोह्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे, असे संजय राऊत म्हणाले.

# कुख्यात टिपू पठाण टोळीला तिसऱ्यांदा मोक्का

**पुणे, ता. १५ :** पुण्यातील हडपसर परिसरात गुन्हेगारीवर लगाम घालण्यासाठी पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर कारवाई केली आहे. कुख्यात गुंड रिझवान उर्फ टिपू सत्तार पठाण आणि त्याच्या टोळीविरुद्ध काळेपडळ पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. एका हॉटेल व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकावल्याच्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली असून टोळीतील फरार आरोपी फैजान उर्फ पच्चीस रमजान उर्फ कादर शेख (वय २१) याला अटक करण्यात आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसरमधील सय्यद नगर परिसरात राहणाऱ्या एका हॉटेल व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकावण्यात आले होते. रिझवान उर्फ टिपू पठाण आणि त्याच्या सात साथीदारांनी संबंधित व्यावसायिकाला त्यांच्या ख्वाजा मंजिल येथील कार्यालयात बोलावून घेतले. तेथे त्याला हॉटेलसाठी लागणारे मटण त्यांच्या भागीदारीतील दुकानातूनच घ्यावे लागेल, असा दबाव टाकण्यात आला. याशिवाय दरमहा ५ हजार रुपये खंडणी देण्याची मागणी करत पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही देण्यात आली.

या प्रकरणी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान टिपू पठाण टोळीचा गुन्हेगारी इतिहास लक्षात घेता पोलिसांनी या टोळीविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय घेतला. या गुन्ह्यातील आरोपी फैजान शेख हा काही दिवसांपासून फरार होता. तो सय्यद नगर परिसरात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

दरम्यान, टिपू पठाण आणि त्याच्या टोळीविरुद्ध यापूर्वीही जमीन बळकावणे आणि खंडणी उकळणे अशा प्रकरणांमध्ये दोनदा मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल झाले होते. मात्र तांत्रिक कारणांमुळे आरोपींना जामीन मिळाला होता. आता तिसऱ्यांदा मोक्का लागू झाल्यामुळे या टोळीच्या अडचणी वाढल्या आहेत.

# लाडक्या बहिणींसाठी मिळणार थेट ३ हजार रुपये

मुंबई, ता. १५ : महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत आर्थिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १५०० थेट बँक खात्यात जमा केले जातात. ही योजना महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी अत्यंत लोकप्रिय ठरली आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून लाभार्थ्यांना हप्त्यांमध्ये अनियमितता आणि विलंब जाणवत आहे.

जानेवारी २०२६ नंतर फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे हप्ते अद्याप अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. यामुळे लाखो महिलांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. आता समोर आलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे दोन हप्ते एकत्रितपणे एप्रिल २०२६ च्या पहिल्या आठवड्यात लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहेत. यामुळे पात्र महिलांच्या बँक खात्यात एकदम तीन हजार जमा होण्याची शक्यता आहे.

**अपात्र महिलांचा लाभ बंद होणार**

योजनेच्या सुरुवातीला अनेक अपात्र महिलांनीही लाभ घेतला होता. त्यामुळे सरकारने ई-केवायसी सक्तीची केली. सुरुवातीला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, केवायसी करताना काही तांत्रिक चुका (जसे चुकीचा पर्याय निवडणे, OTP समस्या इ.) झालेल्या महिलांसाठी दुरुस्तीची संधी देण्यात आली आहे. आता ३१ मार्च २०२६ पर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन उपलब्ध आहे.

# राज्यात पुढील चार ते पाच दिवस पावसाचा अंदाज


**पुणे, ता. १५ :** गेल्या काही दिवसांत राज्यभरात वाढलेल्या तापमानाने हैराण झाल्यानंतर आता पुढील चार ते पाच दिवस पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पावसामुळे वाढलेले तापमान, उष्णता, उन्हाचे चटके यापासून काही प्रमाणास दिलासा मिळू शकतो.

यंदा मार्चच्या पहिल्या आठवड्यातच राज्यातील काही ठिकाणी तापमान ३५ अंश सेल्सियसपेक्षा अधिक, तर विदर्भातील अकोला येथे ४० अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले आहे. मार्चमध्येच उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागली आहे. तीव्र ऊन, घामाच्या धारा यांचा अनुभव उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच येत आहे. मात्र, हवामानात होत असलेल्या बदलांमुळे आता पावसाची स्थितीही निर्माण झाली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या पुणे वेधशाळेतील शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील चार ते पाच दिवस मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात, मार्च रोजी कोकण, गोवा, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुण्यात पुढील चार ते पावस दिवस आकाश मुख्यतः निरभ्र राहून दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

राज्यात मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्रात पावसाची शक्यता आहे. मात्र, केवळ महाराष्ट्रातच नाही, तर छत्तीसगड, ओडिशा, बंगाल, पंजाब येथेही पावसाची शक्यता असल्याची माहिती अनुपम कश्यपी दिली दिली.

# माळेगाव येथील विहरीत आढळला बारामती येथील बेपत्ता तरुणीचा मृतदेह

**पुणे, ता. १५ :** बारामती तालुक्यातील शारदानगर परिसरातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. सहा दिवसांपासून बेपत्ता असलेल्या २१ वर्षीय तरुणीचा मृतदेह माळेगाव खुर्द-केव्हीके रस्त्यालगत असलेल्या विहिरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. प्रतीक्षा दत्तात्रेय मेमाणे असे या तरुणीचे नाव असून या घटनेमुळे तिच्या कुटुंबीयांवर मोठे दुःख कोसळले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रतीक्षा मेमाणे ही शिक्षण घेत होती आणि शारदानगर येथे कुटुंबासोबत राहत होती. ९ मार्च रोजी सकाळी ती घरातून बाहेर पडली होती. मात्र बराच वेळ उलटूनही ती घरी परतली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. नातेवाईक, मित्र-मैत्रिणी आणि ओळखीच्या ठिकाणी चौकशी करूनही तिचा काहीही पत्ता लागला नाही. अखेर कुटुंबीयांनी माळेगाव पोलीस ठाण्यात तिच्या बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली.

तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनीही शोधमोहीम सुरू केली होती. गावकरी आणि मित्रपरिवारही तिचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करत होते. दरम्यान शनिवारी सकाळी माळेगाव खुर्द-केव्हीके रस्त्यालगत असलेल्या एका विहिरीत मृतदेह तरंगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी जाऊन मृतदेह बाहेर काढला. तपासणीदरम्यान हा मृतदेह बेपत्ता असलेल्या प्रतीक्षा मेमाणे हिचाच असल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी सध्या या प्रकरणाची अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, प्रतीक्षाने विहिरीत उडी मारून जीवन संपवले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र तिने असे टोकाचे पाऊल का उचलले याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद करत आहेत.

# कुरकुंभमध्ये महिलेला भररस्त्यात मारहाण; दौंड पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल

**दौंड, ता. १५ :** उसने दिलेले पैसे मागितल्याच्या कारणावरून तरुणाने आपल्या आई आणि बहिणीच्या मदतीने एका महिलेला भररस्त्यातच बेदम मारहाण केल्याची घटना घडली. कुरकुंभ (ता. दौंड) हद्दीतील भोंगळे वस्ती परिसरात शुक्रवारी (ता. १३) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हल्ल्यात महिला जखमी झाली असून, दौंड पोलिसांनी याप्रकरणी दोन महिलांसह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.




संगीता मारुती पवार (वय ३२, व्यवसाय घराकाम, रा भोंगळे वस्ती, कुरकुंभ ता. दौंड) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे तर श्रावण सुरेश गुळीक, उजा सुरेश गुळीक, व पायल (पुर्ण नाव माहीत नाही) सर्व रा. कुरकुंभ ता दौंड) असे मारहाण करणाऱ्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी तिघांवर दौंड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पवार यांनी आरोपी श्रावण सुरेश गुळीक याला काही पैसे उसने दिले होते. शुक्रवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास कुरकुंभ येथील दिल्ली गॅरेजसमोरील रोडवर संगीता पवार यांनी श्रावणकडे पैसे परत मागितले. मात्र, पैसे देण्याऐवजी श्रावणने वाद उकरून काढला. त्यानंतर संतापलेल्या श्रावण गुळीक याने दगडाने मारहाण केली. त्याची आई उजा गुळीक हिने चप्पलने मारहाण केली, तर पायल हिने केस ओढून व हाताने मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या मारहाणीत फिर्यादीच्या डाव्या कानाखाली, डाव्या हाताच्या दंडावर, डाव्या पायाच्या गुडघ्यावर आणि उजव्या हाताच्या कोपऱ्यावर दुखापत होऊन किरकोळ जखमा झाल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाघमारे करत आहेत.

# केडगाव येथे पुण्यातील गुंडाने जमिनीच्या वादातून झाडल्या गोळ्या

**दौंड, ता. १५ :** केडगाव (ता. दौंड) परिसरात जमिनीच्या वादातून गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शनिवारी पहाटे केडगाव स्टेशन परिसरातील एका गृहनिर्माण संस्थेजवळ ही घटना घडली. गोळीबाराचा आवाज ऐकून स्थानिक नागरिक घाबरून घराबाहेर आले आणि तात्काळ पोलिसांना माहिती दिली. या घटनेनंतर पोलिसांनी तत्पर कारवाई करत अवघ्या १२ तासांत एका संशयित आरोपीला अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जमिनीच्या व्यवहारावरून दोन गटांमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. त्याच वादातून हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पहाटेच्या सुमारास एका व्यक्तीने पिस्तुलीतून हवेत गोळीबार केल्याचे समोर आले आहे. गोळीबाराचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिसराची पाहणी केली असता पिस्तुलीतून झाडलेल्या गोळीची पुंगळी घटनास्थळी आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले आणि इतर माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान पोलिसांनी संशयित हालचालींच्या आधारे एका तरुणाला ताब्यात घेतले. सखोल चौकशीनंतर त्याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, जमिनीच्या वादातून झालेल्या या गोळीबारामुळे केडगाव परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने कारवाई केल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून दोन गटांमधील जमिनीच्या वादामागील नेमके कारण काय होते, याचा शोध पोलिस घेत आहेत.

# ठेकेदार अमर जाधव एक वर्षासाठी 'काळ्या यादीत ; पुणे जिल्हा परिषदेची कारवाई

गोरख जाधव

डोर्लेवाडी, ता. १५ : झारगडवाडी (ता. बारामती) येथील अंतर्गत रस्ते कामात भ्रष्टाचार आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या ठेकेदाराला पुणे जिल्हा परिषदेने जोरदार दणका दिला आहे. संबंधित ठेकेदार अमर संजय जाधव याला जिल्हा परिषदेने एक वर्षासाठी 'काळ्या यादीत' टाकले असून, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध घातला आहे. या कारवाईमुळे शासकीय कामात दांडगाई करणाऱ्या ठेकेदारांचे धाबे दणाणले आहेत.



सन २०२२-२३ मध्ये नागरी सुविधा योजनेतून झारगडवाडी येथे १५ लाख रुपयांच्या अंतर्गत रस्त्याचे काम मंजूर झाले होते. हे काम ठेकेदार अमर जाधव यांना देण्यात आले होते. सप्टेंबर २०२२ मध्ये काम पूर्ण झाल्याचे दाखवून ठेकेदाराने बिलही हडपले. मात्र, अल्पावधीतच रस्त्याचा पृष्ठभाग उखडला आणि खडी बाहेर आली. रस्त्याचा दर्जा इतका सुमार होता की, नागरिकांना चालणेही मुश्कील झाले होते.

या भ्रष्टाचाराविरोधात सामाजिक कार्यकर्ते युवराज पोटे यांनी रान उठवले. त्यांनी ग्रामपंचायत आणि पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडे पुराव्यासह लेखी तक्रारी केल्या. प्रशासनाने ठेकेदाराला वारंवार रस्ता दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या, पत्रव्यवहार केला, पण ठेकेदाराने या पत्रांना केराची टोपली दाखवली. अखेर बांधकाम उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे शिक्कामोर्तब झाले. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २९ जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार, पुणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी १० मार्च २०२६ रोजी या कारवाईवर शिक्कामोर्तब केले. आदेशाच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष अमर संजय जाधव यांना जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कामाचे कंत्राट मिळणार नाही. या प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

> शहर व ग्रामीण भागात काही ठेकेदार अधिक नफा मिळवण्याच्या उद्देशाने रस्त्यांची निकृष्ट कामे करतात. काम सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांनीही काटेकोरपणे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. झारगडवाडी येथील रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत वारंवार पत्रव्यवहार करूनही ठेकेदाराने दुर्लक्ष केले. त्यामुळे या प्रकरणात पाठपुरावा केला. अखेर १० मार्च २०२६ रोजी संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली. मात्र रस्त्याची योग्य दुरुस्ती होईपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवणार आहे.
>
> - **युवराज पोटे,** सामाजिक कार्यकर्ते